# अर्थपूर्ण

मे २०१३ | ₹ ४०
पुणे, वर्ष ३, अंक ०५

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत

## पाणी आणि पैशाच्या दुष्काळाचे गुपित



मुख्य संपादक : यमाजी मालकर
संपादक : प्रसाद मिरासदार
सहसंपादक : सम्राट शिरवळकर
editor.arthapurna@gmail.com

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
१०४ निलगिरी अपार्टमेंट्स, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
फोन : ०२०- ३२६००९९६
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

मे २०१३

वर्ष तिसरे
अंक पाचवा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्,
पुणे ९८८१०९८०१०

**मुखपृष्ठ संकल्पना :** चंद्रमोहन कुलकर्णी
**मुखपृष्ठ निर्मिती :** फाल्गुन ग्राफिक्स

**मुद्रितशोधन :** विजय जोशी

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन,
बी १, यशोराम अपार्टमेंट,
४३६-ए, नारायण पेठ,
पत्र्यामारूती गल्ली,
पुणे-४११०३०
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी
व्यवहारासाठी संपर्कः
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

गुंतवणुकीसंबंधी सर्व लेख समज वाढवण्यासाठी प्रसिद्ध केले जातात. त्यांस गुंतवणुकीसंबंधी सल्ला मानू नये. प्रसिद्ध केलेल्या माहितीवर आधारित कोणताही व्यवहार स्वतःच्या जबाबदारीवर करावा. 'अर्थपूर्ण' व सदर लेखक त्यासंबंधीची कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाहीत.

## अनुक्रमणिका

०४ **पाणी, पैशाच्या दुष्काळाचे गुपित...**यमाजी मालकर
०६ **मराठवाड्याची जल परिस्थिती...**अब्राहम साम्युअल, किरण लोहकरे
१२ **महाराष्ट्राची जलनीती आणि दुष्काळ महोत्सव!...**डॉ. संपत काळे
१६ **महाराष्ट्रातील दुष्काळाची दाहकता...**डॉ. दीपक भुसारे
१९ **जागतिक पाणीयुद्ध ...**प्रा. मनोज पांडकर
२२ **पाणी रे पाणी...**दीपक करंजीकर
२४ **जलसंधारणाचेः 'के.एफ.पी' मॉडेल ...**नेहा घाटपांडे
२६ **एल.बी.टी.: एक अव्यवहार्य करप्रणाली...**महेश्वर मराठे
२८ **पैसा टिकवा, पाणी संपवा...**रवींद्र तांबोळी
३० **फक्त दहा वर्षांत मिळवू शकता आर्थिक स्वातंत्र्य...**प्रसाद मिरासदार
३२ **सर्वसामान्यांचा अपेक्षाभंग!...**यशराज
३५ **अक्षय तृतीयेचा मंत्र आणि वळवाचा शिडकावा...**विजय तरवडे
३७ **गुंतवणूक आणि जुगार...**संदीप साठे
४० **ग्रामीण बँकिंग आणि वित्तीय समावेशन...**वंदना धर्माधिकारी
* **पाणी-जग आणि भारत (चौकटी)...**सुहास सापटणेकर

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

## भूमिका

# पाणी, पैशाच्या दुष्काळाचे गुपीत



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**टंचाईच्या काळात माणूस अतिशय असुरक्षित, अस्वस्थ होतो आणि मिळेल तेवढे ओरबाडून घेतो. कारण ती वस्तू, सुविधा त्याला परत मिळण्याची खात्री नसते. आज महाराष्ट्रात पाण्याच्या आणि भारतातल्या भांडवलाच्या टंचाईचे नेमके तेच झाले आहे. जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असलेले पाणी आणि पैशाच्या वापराचे शहाणपण केवळ उपदेश किंवा सुविचार नव्हे तर भेदभावमुक्त व्यवस्थाच देऊ शकते.**

आपल्या देशात आज सर्वाधिक चर्चा ज्या दोन विषयांची आहे, त्यातील पहिला विषय आहे पाणीटंचाई आणि दुसरा विषय आहे भांडवलाची टंचाई. या दोन विषयांमध्ये कमालीचे साम्य आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या दोन्हीही जीवनावश्यक बाबी आहेत. माणूस पाण्याशिवाय जगू शकत नाही, तसा तो आज पैशांअभावीही जगू शकत नाही. पाण्याअभावी तो असुरक्षित असतो तसाच तो पैशांअभावी असुरक्षित झाला आहे. पाणीटंचाई निर्माण झाली की तो पाण्याचा अतिरेकी साठा करायला लागतो, कारण नंतर पाणी मिळाले नाही तर काय करायचे, या विचाराने तो अस्वस्थ होतो. पैशांचे अगदी तसेच आहे. त्याला त्या पैशांचा लगेच काही उपयोग नसतो, मात्र नंतर तो मिळेल की नाही, या विचाराने तो त्याचा साठा सुरू करतो. शुद्ध पाण्याचा साठा करण्याची आणि त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी जशी समाजाची आहे तशीच शुद्ध भांडवलाची जबाबदारीही समाजानेच घ्यायची आहे. ती जबाबदारी एखाददुसऱ्याची आहे, असे ज्या वेळी म्हटले जाते तेव्हा त्याचे विपरीत परिणाम सर्व समाजाला भोगायला लागतात. दूषित पाण्याचे वाढत चाललेले साठे आणि आपल्या जगण्याचा काही संबंध नाही, असे कोणी म्हणत असेल तर तो जसा मूर्खपणा आहे तसाच भांडवलाची किंवा पैशाची शुद्धी आणि आपला संबंध नाही, असे मानणारा वर्ग मूर्खच आहे आणि त्याचे परिणाम त्याला किंवा समाजाला भोगावेच लागतात. आपला समाज आज दूषित पाणी आणि अशुद्ध भांडवलाचे, काळ्या पैशांचे अतिशय विपरीत परिणाम भोगतो आहे.

म्हटला तर एक मोठा फरक असा आहे की पाणी ही माणसाची नैसर्गिक तर पैसा ही माणसाची कृत्रिम गरज आहे. मात्र माणसाच्या नैसर्गिक गरजा भागविण्याचे साधन म्हणूनही आज पैशांचे म्हणजे भांडवलाचे महत्व वाढले आहे. म्हणून तर दुष्काळ पाण्याचा असो की धान्याचा... ती गरज भागविण्यासाठी पैशांची मागणी केली जाते आहे. हे दोन्ही विषय एवढे महत्त्वाचे आहेत की आपल्या जीवनातील अनेक प्रश्नांची उकल आपण त्यांचा विचार केल्याशिवाय करूच शकत नाही. पाणीटंचाई आणि भांडवलाच्या अभावी आज समाजात जी फरपट पाहायला मिळते आहे, तिची तीव्रता कमी करण्यासाठी वेगळा विचार करण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. तो विचार एका उदाहरणातून आपण समजून घेऊ.

सातारा जिल्ह्यात मलकापूर हे नगर परिषद असलेले गाव. काही वर्षांपूवी त्या गावात पाण्याची टंचाई होती. ती इतकी की तेथील मुलांना मुली मिळत नव्हत्या. पाणी भरण्याच्या कामाने महिला त्रस्त झाल्या होत्या. गावातील शहाणी माणसे एकत्र आली आणि हा प्रश्न सोडविण्याचा त्यांनी संकल्प केला. पाण्याचे साठा असून पाण्यासाठीची वणवण त्यांना नकोशी झाली होती. त्यांनी पाणीवितरणात तंत्रज्ञानाची मदत घेतली आणि संगणकीकृत व्यवस्था उभी केली. शिवाय पाणी बहुमोल असल्याने ते आता मीटर पद्धतीने

वापरले पाहिजे, हेही मान्य केले. म्हणजे सगळ्या गावानेच आपली पाणीप्रश्नाकडे पाहण्याची मानसिकता बदलली. हा मोठा बदल होता म्हणून हे घडून येण्यास वेळ लागला, मात्र त्याशिवाय पर्याय तरी कोठे होता?

मलकापुरात आज २४ तास नळाला पाणी येते. मलकापूरच्या या प्रयोगाचे (चौकट पाहा) एकच कळीचे गुपित आहे. टंचाईच्या काळात माणूस अतिशय असुरक्षित होतो आणि मिळेल तेवढे ओरबाडून घेतो. कारण ती वस्तू, सुविधा त्याला परत मिळण्याची खात्री नसते. आज महाराष्ट्रात पाण्याच्या टंचाईचे तेच झाले आहे. पाणी कमी उपलब्ध आहे, ही वस्तुस्थिती आहे, मात्र नियोजन केले तर ते सर्वांना पुरून उरू शकते. कोणत्याही गावात किंवा शहरात गेलात आणि तेथील पाणीप्रश्नाविषयी कोणाला विचारले तर त्याचे उत्तर ठरलेले असते. पाणी भरपूर आहे हो, मात्र त्याचे नियोजन नाही. त्याचे नियोजन कोण करणार, या प्रश्नाला मात्र कोणाकडेच उत्तर नसते. ते उत्तर मलकापूरने दिले आहे. पाण्याला आपण जीवन म्हणतो, कारण त्याशिवाय माणूस आणि सजीवसृष्टी जगूच शकत नाही. त्यामुळेच समान पाणीपुरवठा करण्याचे म्हणजे पाणी पुरविण्यातील भेदभाव काढून टाकण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. सार्वजनिक




शहाणपण काय करू शकते, हे मलकापूरने दाखवून दिले आहे. पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या महाराष्ट्रासाठी आज गरज आहे ती या शहाणपणाची. खरी पाणीटंचाई तेथेच आहे, जेथे पाण्याचा स्रोतच नाही, मात्र तेथे पाणी नेण्याची व्यवस्था का होऊ शकली नाही, याचे कारण पुन्हा भांडवलाशी जाऊन भिडते. आखतात समुद्राचे पाणी गोड करून वापरले जाते, अमेरिकेत पाणी नसलेल्या भागात मुबलक पाणी असलेल्या भागातील पाणी कॅनॉलमधून खेळविले जाते, तर आपल्या देशात ते का होऊ शकत नाही?

आपण म्हणाल पाण्याचे ठीक आहे, मात्र येथे पैशाचा काय संबंध आहे? तो संबंध कसा आहे पाहा. आज शुद्ध भांडवल नाही म्हणून पत नाही, म्हणून देशातील कोट्यवधी नागरिक हलाखीचे आयुष्य जगत आहेत. वास्तविक आमच्या देशातील बँकिंग वाढले तर देशातील पैसा कमी व्याजदरात त्यांना वापरायला मिळेल. आज मात्र होते आहे ते असे: देशाची संपत्ती काही पटींत वाढूनही आमच्यातली असुरक्षितता वाढली आहे. त्यामुळे काळ्या पैशाच्या माध्यमातून पैसा ओरबाडला जातो आहे. तो इतका की बाकीच्यांच्या वाट्याला तो येतच नाही. त्यामुळे शेती, कारखाने, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याऐवजी आम्ही सोन्याचांदीमध्ये गुंतवणूक करतो. पाणी भरपूर आहे, मात्र वितरण बिनसले तसेच संपत्ती भरपूर आहे मात्र ती बँक प्रणालीच्या माध्यमातून सर्वांना नवनिर्मिती करण्यासाठी उपलब्ध नाही. ती तिजोऱ्यांमध्ये सडते आहे किंवा बडेजाव म्हणून शरीरावर मिरवते आहे. पाण्याचे आणि पैशाचे हे सूत्र ज्यादिवशी समाजाला कळेल त्यादिवशी हे प्रश्न सुटतील आणि सर्वांना शांत, समृद्ध आणि प्रामाणिक आयुष्य जगण्याची संधी मिळेल.

### मलकापूरमधील सामूहिक शहाणपण

- ▶ पाणी विकत घेण्याची मानसिक तयारी.
- ▶ सर्व घरांमध्ये पाणीमीटरचा वापर, सर्व व्यवस्था स्वयंचलित (मीटरची किंमत ७,९०० रु., हा निधी लोकप्रतिनिधीच्या निधीतून मिळविला).
- ▶ 'प्रेशर मॉनिटर'मुळे पाण्याच्या प्रेशरचे नियंत्रण.
- ▶ बेकायदा नळ कनेक्शन घेतल्यास यंत्रणेला माहिती मिळण्याची सोय.
- ▶ 'अधिक पाणीवापर अधिक पाणी दर' हे सूत्र सर्वांनी मान्य केले.
- ▶ २४ तास पाणी उपलब्ध असल्याने पाण्याचा वापर ३० टक्क्यांनी कमी झाल्याचे सिद्ध. मीटर पद्धतीमध्ये पाणी महाग होते, हा गैरसमज दूर. ७० टक्के गावकऱ्यांना दरमहा १०० रुपये बिल.
- ▶२४ तास पाण्यामुळे लोकसंख्या ५ वर्षांत २३४ टक्क्यांनी वाढली.